**BDC LIBRARY**
**New Paper Clipping**
**A.Y. 2023-202**

# डॉ. संदीप तडाखे यांची सातारा जिल्हा समन्वयकपदी निवड



**पाटण**, दि. ११ : महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत सातारा जिल्हा समन्वयकपदी कोयना शिक्षण संस्थेच्या बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटणमधील भूगोलशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. संदीप तडाखे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रा. डॉ. संदीप तडाखे हे अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम मागील खूप वर्षांपासून सातत्याने राबवित आहेत. महाविद्यालयीन अंतर्गत गुणवत्ता हमी समिती सहसमन्वयक, महाविद्यालयीन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र समन्वयक, महाविद्यालयीन प्लेसमेंट सेल समन्वयक असून त्यांनी आतापर्यंत जवळपास ३७ आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय शोधनिबंध प्रकाशित व सादर केले आहेत. त्यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेऊन सातारा जिल्हा समन्वयकपदी निवड केली आहे.

प्रा. संदीप तडाखे यांच्या निवडीबद्दल कोयना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. सोपानराव चव्हाण, उपाध्यक्ष प्रकाश पाटील, जनरल सेक्रेटरी श्रीमंत अमरसिंह पाटणकर, संचालक संजीव चव्हाण, याज्ञसेन पाटणकर यांच्यासह सर्व संचालक सदस्य तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी, प्राचार्य डॉ. एस.डी. पवार, कार्यालयीन अधीक्षक विजय काटे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक आणि प्रशासकीय कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले.